# म. गांधी यांचे सर्वोदयी अर्थविषयक विचार

**डॉ. नागेश मधुकर महाडिक**, सहाय्यक प्राध्यापक,राजाराम कॉलेज, कोल्हापूर.

---

**प्रस्तावना :**

जागतिकीकरणाच्या लाटेने केवळ आपल्या अर्थव्यवस्थेवरच परिणाम केला नसून आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनावर देखील दूरगामी परिणाम केला आहे. आज आपण 'भारतीय नागरिक' म्हणून नव्हे तर 'जागतिक नागरिक' म्हणून जीवन जगणे अधिक पसंत करू लागलो आहोत. परिणामी आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल झालेला दिसून येतो. नाविन्याची ओढ एकसारखी वाढत आहे. नव्या खर्चिक जीवनशैलीमुळे रोग प्रतिकार शक्ती आपल्या शरीराच्या संरक्षणाचे काम प्रभावीपणे करण्यास कमी पडत आहे. मानवाची आजची बदलती जीवनशैली मानवाच्या मानसिक, शारीरिक, सामाजिक विकासास घातक ठरत आहे. त्यामुळे महात्मा गांधीनी सांगितलेल्या जीवनशैलीचा अवलंब केल्यास संपूर्ण पृथ्वीतलावरील पर्यावरण, मनुष्य, प्राणीमात्र अशा सर्वांचे कल्याण होईल. तसेच यातून मनुष्याचा उदरनिर्वाह आणि राहणीमानाचा दर्जा उंचावेल. सर्वत्र समूह वृत्तीने जगण्यास प्रवृत्त होतीलच शिवाय, एकमेकास सहकार्य, मद्दत आणि आपलेपणाची भावना दृढ होईल. ग्रामीण भागात हस्त उद्योग वाढ होऊन रामराज्याची संकल्पना साकार रूप घेऊ शकेल. याच करिता महात्मा गांधी यांनी मांडलेले आर्थिक विचारांचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मनुष्य मूलतः सत्प्रवृत्त आहे. हा सर्वोदय विचारांचा पाया आहे. सर्व मानवांचा संपूर्ण विकास साधनेची जीवनपद्धती म्हणजे सर्वोदय. हा विकास प्रेम, करुणा या मार्गाने साधेल आणि समग्र मानव जातीला शांतता लाभेल असा सर्वोदयचा मूलभूत सिद्धांत आहे. अन्यायाच्या प्रतिकारासाठी अहिंसात्मक रीतीने व सामुदायिक स्वरूपाने सत्याग्रह केला पाहिजे अशा कृतीची शिकवण सर्वोदय देतो.

गांधीनी सर्वोदय विचाराच्या मांडणीमध्ये सत्ता, संपत्तीच्या विकेंद्रीकरणावर भर दिला तसेच ग्रामपंचायती सारख्या साधनाचा पुरस्कार केला. आत्मक्लेश आणि प्रतिपक्षाचे हृदय परिवर्तन करता येते हे त्यांनी वेगवेगळया लढ्यातून दाखवून दिले. गांधींनी 'माझे सत्याचे प्रयोग' या आत्मकथेत रस्किनच्या पुस्तकातील सारांश स्पष्ट केला आहे.

१) एका व्यक्तीचे हित सर्वांच्या हितात सामावले आहे.

२) वकिलाच्या व न्हाव्याच्या कामाचे मोल सारखेच आहे कारण सर्वांना आपल्या उद्योगाच्या आधारे आपली जीविका कमवायचा हक्क असतो.

३) मजुराचे जीवन म्हणजेच शेतकऱ्याचे व अंगमेहनत करणारे जीवन हेच खरे जगणे योग्य जीवन होय. या तीन मूलभूत मूल्यांवर सर्वोदय विचार आधारलेला आहे.

**सर्वोदयप्रणित अर्थव्यवस्था** :

सर्व व्यक्तींना समान विकासाची संधी, समाजातील शेवटच्या व्यक्तीची उन्नती साधणे हा महात्मा गांधीजींच्या सर्वोदय आर्थिक विचाराचा केंद्रबिंदू आहे. आर्थिक विषमता कमी करणे हे तत्त्व त्यांना अंमलात आणायचे होते. गांधी त्यांच्या मते, अप्रत्यक्ष कराचे प्रमाण कमी करून प्रत्यक्ष कराचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढवले पाहिजे. दारू व्यवसाय करून सरकारने अबकारी कर मोठ्या प्रमाणात मिळवावा याला गांधी विरोध करतात. गांधीजींच्या मते, दारूबंदी केल्याने सरकारचा अबकारी कर बुडेल आणि त्याचा परिणाम शिक्षणावरील खर्चात कपात होईल, असा दारूबंदी विरोधकांचा दावा आहे तो पूर्णतः चुकीचा आहे. गांधी यावर आक्षेप घेताना म्हणतात, "ज्या कराच्या बदल्यात लोकांना आवश्यक त्या सुविधा दसपटीने उपलब्ध होतील तोच खरा हितावह कर होय. लोकांच्या शारीरिक, मानसिक व नैतिक अधःपतनातून मिळविला जाणारा दारूवरील कर अत्यंत चुकीचा आहे. अबकारी करापासून मिळणाऱ्या उत्पन्नाची हाव न धरता लोकांना दारूपासून वाचविण्याचे शासनाचे पहिले कर्तव्य आहे."

गांधीजींच्या मते, शासनाला अधिक उत्पन्नाची गरज असेल तर भारतामध्ये श्रीमंतांवर अधिक कराचा बोजा टाकण्यास भरपूर वाव आहे. इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे अतिरिक्त उत्पन्नावर कर आकारण्यात येतो. त्या तुलनेमध्ये भारतामध्ये खूप कमी प्रमाणात कर आकारण्यात येतो असे स्पष्ट करतात. सरकारने वारसा कर बसवून मालमत्तेचा काही भाग आपल्याकडे घ्यावा जेणेकरून समाजातील विषमता कमी करता येईल, असे गांधीजींचे मत होते.[१]

**मानवतावादी अर्थव्यवस्था:**

गांधीजी गरीब-श्रीमंत, बुद्धिजीवी-श्रमजीवी जनतेत फरक करीत नाहीत. विषमतेवर आधारलेला समाज कधीही अहिंसक राहू शकत नाही असे गांधीजींचे मत होते. आर्थिक समतेसाठी प्रयत्न करणे म्हणजे भांडवल व श्रम यांच्यामध्ये संघर्ष उभा करणे असा अर्थ होत नाही. जे थोडे धनिक देशातील प्रचंड संपत्ती बाळगून आहेत त्यांचा स्तर काही प्रमाणात खाली आणणे व जे अत्यंत हालाखीच्या स्थितीत जीवन जगत आहेत त्यांची पातळी उंचावणे असा आर्थिक समतेचा अर्थ गांधींना अभिप्रेत होता. गांधी यांच्या मते, श्रीमंत व गरीब यांच्यातील तफावतीप्रमाणेच श्रमजीवी व बुद्धिजीवी यांच्यातील देखील आर्थिक विषमता मानवाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून डॉक्टर, सुतार, वकील, शिक्षक, भंगी यांचे मजुरीचे दर सारखेच असले पाहिजेत. गांधी यांच्या मते, “भौतिक श्रम हे सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणारे असतात, आनंददायी असतात पण बौद्धिक अन्न हे आपण जे धान्य खातो त्याला पर्याय देऊ शकत नाही. भौतिक श्रमाचे ही तसेच आहे. जे शरीरश्रमापेक्षा श्रेष्ठ असले तरी ते त्याला पर्याय नाही. म्हणून समाजाच्या पालनपोषणासाठी शारीरिक श्रम करणे. हे प्रत्येक माणसाचे जन्मसिद्ध कर्तव्य आहे.”[२]

प्रत्येकाला उपजीविकेसाठी आवश्यक असलेली साधनसामग्री उपलब्ध झाली पाहिजे. एखाद्या व्यक्तीच्या उपजीविकेसाठी लागणारा खर्च अधिक आहे म्हणून त्याला जास्त पैसा देणे. एखाद्या गरीब व्यक्तीला गरजा कमी आहेत म्हणून कमी पैसा देणे हे योग्य नाही, असे गांधी स्पष्ट करतात. प्रत्येक व्यक्तीला संतुलित भोजन, राहण्याकरता नीटनेटके घर, मुलांच्या शिक्षणाची योग्य सोय, आरोग्य चिकित्सा उपलब्ध होणे गरजेचे आहे. सर्वांना समान संधी प्राप्त झाल्यास समान उन्नती होईल असे गांधी स्पष्ट करतात. गांधीजींच्या मते, आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठी समान वितरण पद्धतीचा आपण स्वीकार केला पाहिजे. मूठभर लोकांच्या हाती भांडवल गोळा होण्याची आवश्यकता नाही. उलट ते भांडवल अशाप्रकारे वितरित करणे आवश्यक आहे की देशातील साडेसात लाख गावांमधून ते उपलब्ध व्हायला हवे.[३] समान वितरण हा माझा आदर्श आहे.

गांधीजींच्या मते, भारतीय संस्कृती त्यागप्रधान आहे. तिला स्पर्धेऐवजी सहकार्याचे अधिष्ठान आहे. जीवनात आपण भौतिक गोष्टींपेक्षा नैतिक गोष्टींना प्राधान्य दिले पाहिजे. गांधी आपल्या आर्थिक विचारांमध्ये शरीरश्रम, साधी राहणी, ग्रामोद्योग, विकेंद्रीकरण, स्वायत्त व स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था या बाबींना प्राधान्य देतात या बाबींवर त्यांचा मृत्यूपर्यंत कायम विश्वास होता. रेल्वे, इस्पितळे, यंत्रे, सैन्य, नौदल, कायदे, न्यायालय यांना स्वराज्यामध्ये स्थान असेल परंतु ते मर्यादित प्रमाणात. रेल्वेचा वापर सैन्य इकडून तिकडे नेण्यासाठी केला जाणार नाही. देशाच्या आर्थिक पिळवणुकीला कारणीभूत ठरणार नाही. रेल्वेचा उपयोग अंतर्गत व्यापार आणि तिसऱ्या वर्गाच्या उतारूना प्रवास सुखकर करण्यासाठी केला जाईल. दवाखाने, रुग्णालये यांचा वापर अतिसेवनाने आजारी पडणाऱ्या लोकांपेक्षा अपघाताने जखमी झालेल्या लोकांच्या सेवेसाठी करण्यात येईल. सैन्य, पगारी नोकर नसून स्वयंसेवकांचे असेल, दुसऱ्या राष्ट्राला अंकित करण्यासाठी सैन्याचा वापर केला जाणार नाही तर शांतता सुव्यवस्था राखण्यासाठी त्याचा वापर केला जाईल. न्यायालय ही व्यक्तीचे स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी असतील. गांधींच्या आर्थिक विचारांमध्ये अपरिग्रह व्रताला स्थान होते. ‘गरजा कमीत कमी ठेवा’ असा संदेश त्यांनी दिला तो संदेश त्यांनी देशातील श्रीमंत मध्यमवर्गीय व राज्यकर्त्यांना दिलेला होता.

गांधींच्या आर्थिक विचारांमध्ये मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि वैद्यकीय मदत यांची पूर्तता झाली पाहिजे असा मानवतावादी दृष्टिकोन आढळतो. समतावादी दृष्टिकोनातून आर्थिक विकासाकडे पाहिले पाहिजे असा त्यांचा दृष्टिकोन होता. जर तुमच्या दृष्टीने समृद्धी याचा अर्थ प्रत्येकाला भरपूर खायला प्यायला मिळावे, कपडालत्ता मिळावा. मनावर सुसंस्कार घडविण्यासाठी संधी मिळावी, हाच असेल तर माझे समाधान होईल. मात्र अपचन होईल त्याहून अधिक अन्न पोटात ढकलणे आणि उपयोग नसलेल्या वस्तूंचा

संग्रह करीत बसणे. मला मुळीच पसंत नाही'. मानवाला त्याच्या सुद्गुणांचा विकास करावयाचा असेल तर त्याला शांततेची आवश्यकता असते. मानवकेंद्रित व नैतिकतेवर आधारित अर्थव्यवस्था निर्माण केल्यास सर्व मानवजातीला सुखकर आयुष्य जगता येईल असे गांधी स्पष्ट करतात.

**चिरस्थायी विकासाचा मार्ग :**

भारत हा खेड्यांचा देश आहे खेड्यांचा विकास झाला तरच राष्ट्राचा विकास होणे शक्य आहे हे गांधीजींनी ओळखले होते. परिणामतः गांधी काँग्रेसच्या सर्व कार्यकर्त्यांनी सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम हिरीरीने राबवावा असे स्पष्ट करतात. हिंदू मुस्लिम ऐक्य अस्पृश्यता निवारण आणि खादीप्रसार असा एक विधायक कार्यक्रम त्यांनी कार्यकर्त्यांच्या पुढे ठेवला. कालांतराने दारूबंदी, ग्राम सुधारणा, स्त्रीशक्ती जागृती, हिंदी भाषा प्रचार, आदिवासींची उन्नती यांचा या कार्यक्रमांमध्ये समावेश करण्यात आला. गांधीनी विधायक कार्यक्रमात सूतकताई आणि खादी प्रसार यांना अग्रस्थान दिले. भारतातील शेतकऱ्याला दुय्यम व्यवसाय मिळवून देण्याचे एक साधन म्हणून गांधी चरख्याकडे पाहतात. चरख्याच्या निमित्ताने शेतकऱ्यांच्या प्रश्नांना गांधींनी प्रथम स्थान विधायक कार्यक्रमांमध्ये दिले होते.[४]

भारतासारख्या खंडप्राय देशाला अन्न, वस्त्र यांसारख्या गोष्टींबरोबरच स्वावलंबी बनवण्याशिवाय गत्यंतर नाही हे गांधीजींनी ओळखले होते. यासाठी अत्यल्प उत्पादन खर्च, सोपे तंत्र या सारख्या साधनांद्वारे साध्य करता येऊ शकते. देशातील फार मोठी कापड मागणी चरख्याद्वारे पूर्ण करता येऊ शकते. बेकारी निवारण्याचे मुख्य साधन म्हणून गांधी चरख्याकडे पाहतात. चरखा हा आपल्या राष्ट्रीय जीवनातील अत्यंत स्वाभाविक व सर्वात महत्त्वाचा घटक आहे असे गांधी स्पष्ट करतात.

**गांधी विचारावर आधारित अर्थव्यवस्था :**

संघ आपल्या ध्येयाची परिपूर्ती करण्यासाठी गावकऱ्यांकडून आणि इतरांकडून वर्गणी गोळा करील. गरीब लोकांकडून पैसा घेण्यावर खास भर देण्यात येईल.[५] गांधी पंचायत व्यवस्थेची राजकीय रचना स्पष्ट करून आपल्या स्वप्नातील भारत कसा असेल याचे देखील चित्रण करतात. भारतात कोणीही दरिद्री नसेल, भिकारी नसेल, उच्च नसेल, नीच नसेल, ना कोणी लखपती असेल ना कोणी अर्धपोटी कर्मचारी असेल ना, मादक पेय असतील ना, धुंद करणारी औषधे असतील, तिथे जो सन्मान पुरुषाला मिळेल तोच स्त्रियांना मिळेल, स्त्री-पुरुषांच्या पावित्र्याचे काळजीपूर्वक रक्षण केले जाईल. तिथे आपल्या पत्नी शिवाय सर्व स्त्रियांना सर्व धर्मातील लोक वयानुसार आई बहिण व मुलगी मानून व्यवहार करतील. तिथे अस्पृश्यतेची नाव निशाणी नसेल आणि सर्व धर्माकडे समान आदराने पाहिले जाईल. तिथे सर्व लोकाजवळ भाकरी असेल. श्रम करणे हीच अभिमानाची गोष्ट समजतील. सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित ग्रामरचना गांधी प्रतिपादित करतात.

माणसाचे स्वातंत्र्य, त्याची प्रतिष्ठा या बाबी गांधींना अमोल वाटल्या. त्यामुळे गांधी म्हणतात, ज्या राज्यरचनेत शासन कमीत कमी असेल ती सर्वोत्तम अशी राज्यरचना होती. गांधींना मुक्त समाज अपेक्षित होता. केंद्रित राज्यव्यवस्थेऐवजी विकेंद्रित राज्यव्यवस्थेची त्यांनी आवश्यकता प्रतिपादन केली होती. म्हणून ते म्हणतात, स्वातंत्र्याची सुरुवात खालपासून झाली पाहिजे. प्रत्येक गाव पूर्ण प्रजातंत्र असेल. स्वायत्तता आणि स्वशक्तीच्या आधारावर स्वावलंबी आणि परिपूर्ण असे बनेल. स्वायत्त आणि स्वयंपूर्ण अशा अगणित गावांचे राष्ट्र राहील त्याचा विस्तार एकावर एक अशा प्रकारच्या मिनाराप्रमाणे नसेल तर समान अशा व्यापक समुद्राच्या लाटांप्रमाणे असेल. मिनाराच्या रचनेत अरुंद शिखरावरचा भार विस्तृत पायावर पडतो. समुद्राच्या लाटा मात्र वर्तुळाकार असतात या रचनेचा मध्यबिंदू व्यक्ती राहील. अशी व्यक्ती नेहमी कामांसाठी समर्पण करण्यास तयार राहील व गाव आपल्या पंचक्रोशीसाठी समर्पण करण्यास तयार असेल व पंचक्रोशी आपल्या राष्ट्रासाठी समर्पण करण्यास तयार असेल. गावाबाहेरील सत्ता आपल्या शक्तीचा उपयोग ग्रामशक्ती नष्ट करण्यासाठी किंवा तिचे शोषण करण्यासाठी करणार नाही. तर ती शक्ती वाढावी म्हणून आपल्या शक्तीचा उपयोग करेल. अशा रचनेत कोणी पहिला नाही व कोणी शेवटचा नाही. मी अशा भारतासाठी प्रयत्न करीन ज्यात गरीबाहून गरीब अनुभव करेल की हा त्याचा देश आहे आणि देश निर्माणात त्याच्या आवाजाचे महत्त्व आहे. खरे स्वराज्य मूठभर लोकांच्या हाती सत्ता येणे यांनी निर्माण

होणार नाही. पण जेव्हा सत्तेचा दुरुपयोग होत असेल त्यावेळी सर्व लोकांस त्याचा प्रतिकार करण्याची क्षमता प्राप्त करण्याने खरे स्वराज्य निर्माण होईल. असे गांधी स्पष्ट करतात.

राज्यरचनेत जे काम गावात वा शहरात होऊ शकेल ते करण्याची सत्ता गावास व शहरास राहील. जे काम तेथे होऊ शकत नसेल ती सत्ता जिल्ह्यास राहील. अशा क्रमाने प्रांतास, केंद्रास सत्ता राहील. केंद्र-राज्य संबंध सुरळीत होऊन नुसते खेड्यांना व शहरांना नव्हे तर राज्यांना आपल्या अधिकाराचे, जबाबदारीचे भान राहील. केंद्राजवळ कमीत कमी खाती म्हणजे संरक्षण, विदेशी संबंध, गृह, रेल्वे, मुद्रा, डाकतार इ. खाली राहतील बाकी सर्व विषय खाली असतील.

गांधीजींच्या मते, राजकारणावर सतत लोकमताचा दबाव असेल. नागरिक दैनंदिन राजकारणात न पडता लोकांची सतत सेवा करून व सत्याग्रहाद्वारे अन्यायाशी मुकाबला करण्यास जनतेस प्रवृत्त करून लोकमत बनवणाऱ्या व्यक्ती, वर्गाची कल्पना ही गांधींची राजनीती-शास्त्राला अमोल देणगी आहे. लोकांची सेवा करुन विधायक कार्यक्रमद्वारा लोकांना जागृत ठेवण्याची कल्पना अत्यंत मौलिक आहे. कारण सत्याग्रह दररोज करावयाचा नसतो आणि सेवा म्हणजे मंदिर, धर्मशाळा, जलाशय इतक्या पुरती मर्यादित नसून गांधीजींच्या विधायक कार्यक्रमास व्यवस्था परिवर्तनाचा व निकोप राष्ट्राच्या उभारणीचा महत्वाचा आयाम आहे. विधायक कार्यक्रमावर जोर हे गांधीजींचे समाजपरिवर्तनाचे महत्त्वाचे साधन आहे. अशा स्वरूपाचे स्वराज्य गांधींना अपेक्षित होते.

**समारोप :**

सर्व व्यक्तींना समान विकासाची संधी, समाजातील शेवटच्या व्यक्तीची उन्नती साधणे हा महात्मा गांधीजींच्या सर्वोदय आर्थिक विचाराचा केंद्रबिंदू आहे. तसेच भारतीयांना खऱ्या स्वातंत्र्याचा उपभोग घ्यावयाचा असेल तर त्यासाठी भारतीयांनी स्वतःचे प्रश्न लक्षात घेऊन पर्याय शोधले पाहिजेत. यासाठी गांधी 'सर्वोदय' ही कल्पना मांडतात. महात्मा गांधीजींनी एका अर्थाने पर्यावरण, मनुष्य, वित्त यांचा सर्वोदय विचारावार आधारित ऐक्य कसे साधता येईल. मनुष्य जीवन शैली कशी असावी, राज्यामध्ये कोण कोणते काम करेलत्याचे आचरण कसे असायल पाहिजे याचा यथोचित मागोवा घेतला आहे, हे या वरील विचारातून स्पष्ट दिसते.

**संदर्भ सूची :**

1. गांधी मो. क., (१९५२), महात्मा खंड-३. नवजीवन प्रकाशन हाऊस, अहमदाबाद. पृ.क्र. २१४
2. पंडित नलिनी, (१९८३), गांधी, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. २४५
3. यंग इंडिया (२३/३/२०२१) पृ.क्र.९३
4. पाटील प्रमोद, (२०२२), "सर्वोदय विचारातील विनोबा भावे व जयप्रकाश नारायण यांच्या योगदानाचा तुलनात्मक अभ्यास" पीएच.डी. अप्रकाशित शोधप्रबंध, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ.क्र. १५२,१५३
5. हरिजन, (१५/२/१९४८) पृ.क्र. ३२